



# पारनेर दर्शन







वर्ष ३ अंक ३७, गुरुवार २६ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# पवळदऱ्यात वाळू उपशावर कारवाई

## महसूल विभागाच्या पथकाची कामगिरी

पोखरी : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्याच्या हद्दीतून वाहणाऱ्या मुळा नदीपात्रातून वाळूचा उपसा करून त्याची वाहतूक करणारा डंपर तसेच वाळू उपसा करणारे जेसीबी मशिन महसूल विभागाच्या पथकाने रंगेहात पकडून जप्त केले. याच महिन्यात पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने पळशी नागापूरवाडी येथे चोरीची वाळू वाहतूक करणारे दोन डंपर जप्त करून आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यापाठोपाठ महसूल विभागाने पवळदऱ्यामध्ये कारवाई केल्याने पोलीस आणि महसूल विभाग वाळू तस्करीविरोधात ॲक्शन मोडवर आले आहेत.**

यासंदर्भात मिळालेल्या माहीतीनुसार तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांनी वाळूतस्करीविरोधात कठोर धोरण जाहिर केल्यानंतर पारनेर तालुक्यातून वाहणाऱ्या नदीपात्रांतील वाळू तस्करी थंडावली होती. लोकसभा निवडणूकीनंतर पुन्हा वाळू तस्करी सुरू झाल्यानंतर तक्रार आल्यानंतर नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेने पळशी नागापुरवाडी येथे दोन डंपरवर कारवाई करत सुमारे ४७ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त करत दोघा आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केल्यानंतर वाळू तस्करी थांबेल असे वाटत असतानाचा पळवदरा येथे वाळू तस्करी होत असल्याची माहीती महसूल विभागाला मिळाल्यानंतर पवळदऱ्यामध्ये जेसीबीच्या मदतीने वाळू उपसा करून डंपरमध्ये भरण्यात येत होती. पथकाने डंपर आणि जेसीबी ताब्यात घेतले. यांत्रीक उपकरण आणि डंपर जप्त करण्यात येउन तहसिल कार्यालयाच्या आवारात आणून लावण्यात आले.



■ महसूल विभागाच्या पथकाने पवळदऱ्यामध्ये अवैध वाळू उत्खनन करणाऱ्या जेसीबी, डंपरवर कारवाई करण्यात आली.

### तस्करांची आरेरावी

मिळालेल्या माहीतीनुसार महसूल विभागाने कारवाई केल्यानंतर वाळू तस्करांनी अरेरावी करण्याचा प्रयत्न केला. मात्र या अरेरावीस न जुमानता पथकाने धडक कारवाई केल्याची माहीती आहे.

### महसूल विभागाशी संपर्क नाही

यासंदर्भात महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होउ शकला नाही. ख्रिसमिसची सुटी असल्याने कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी आउट ऑफ रेंज होते.

### सुपा टोलनाक्यावरील कारवाई गुलदस्त्यात !

सुपा टोलनाक्यावर अवैध गौण खनिज वाहतूकीवर वॉच ठेवण्यासाठी कॅमेरे बसविले आहेत. त्याची पडताळणी करण्यात आली असता एकाच पावतीवर दिवसभर गौण खनिजाची वाहतूक करण्यात आल्याचे उघड झाले होते. संबंधित वाहनचालकास तहसिलदारांनी नोटीसही बजावली होती. महिनाभरात खुलासा करून दंड भरण्यासही सांगण्यात आले. मात्र नोटीसचा केवळ देखावा करण्यात आला. अद्यापही ही कारवाई गुलदस्त्यात असून त्याचा महसूल विभागाने खुलासा करणे अपेक्षीत आहे.


### महिनाभरापासून सुरू होती तस्करी

संबंधित तस्कराकडून गेल्या महिनाभरापासून पवळद-यामध्ये वाळूची तस्करी सुरू होती. जेसीबीने वाळू उपसा करून डंपरच्या मदतीने दररोज पाच ते सहा डंपर वाळूचा उपसा करण्यात येत होता अशी माहीतीही हाती आली आहे.

# शिरूर तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यात चिमुरडीचा मृत्यू!

## ■ आई समोरच ओढत नेल्याची दुर्दैवी घटना ■ अडीच महिन्यांत तीन चिमुरड्यांचा बळी

शिरूर : प्रतिनिधी



**शिरूर तालुक्यातील पूर्व भागात पिंपळसुटी येथे बिबट्याने हल्ला करून चार वर्षीय चिमुरडीला आई समोरच ओढत नेल्याची घटना घडली असून, दोन तासानंतर चिमुरडीचा मृतदेह लचके तोडलेल्या अवस्थेत सापडला आहे. शिरूर तालुक्यातील पूर्व भागात तिसऱ्या चिमुरडीचा बिबट्याच्या हल्ल्यात बळी गेल्याने नागरीकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.**

या बिबट्याच्या हल्ल्यात चिमुरडीचे धड व डोके वेगळे झाले होते. मुलीचा मृतदेह पाहताच मुलीचे आई-वडील व नातेवाईकांनी टाहो फोडल्याने परिसरातील वातावरण गंभीर बनले होते.रक्षा अजय निकम (वय ४ वर्षे रा. पिंपळसुटी ता. शिरूर)असे बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या चार वर्षीय चिमुरडीचे नाव आहे.काल मंगळवारी सायंकाळी सात ते साडेसातच्या दरम्यान ही घटना घडली.

शिरूर तालुक्यातील पिंपळसुटी येथील नदीकिनारी दशक्रिया घाटाजवळ राहणारे निकम कुटुंब यांची चार वर्षीय मुलगी अंगणात खेळत होती तर आई वीज गेल्याने दुसऱ्या मुलाला जेवू घालत असताना अचानक आई समोरच बिबट्याने हल्ला करून चिमुरडीला शेतामध्ये फरपटत नेले. आईने त्याच्या मागे जाण्याचा प्रयत्न केला परंतु बिबट्या तिला ओढत लांब घेऊन गेला त्यानंतर आईने आरडाओरडा केल्यावर नागरिक जमा झाले. वनखात्याला कळविल्या नंतर ते तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मुलीचा शोध सुरू केला त्यानंतर जवळपास दोन ते अडीच तासांनी चिमुरडीचा मृतदेह आढळला. रात्री उशिरा वन खात्याच्या वतीने शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.

शिरूर तालुक्यातील पूर्व भागात या अगोदर मांडवगण फराटा येथे दोन लहान मुलांना नातेवाईकांसमोर बिबट्याने हल्ला करून ठार मारले आहे. त्यानंतर ही पूर्व भागातील तिसरी घटना आहे . त्यात या लहान चिमुरडीचा मृत्यू झाला आहे.या घटनेने नागरीकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे.

# विरोधकांनी बीड, परभणीत जाण्यास माझी हरकत नाही

## ...पण तिथे राजकारण किंवा पर्यटन करू नये ! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा टोला

नागपूर : प्रतिनिधी

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे राज्यभरातील वातावरण तापलेलं असतानाच त्या विषयालाही हात घातला. बीड जिल्ह्यात कुणाचीही दादागिरी चालू देणार नाही, असा इशारा फडणवीस यांनी दिला. तसेच कुणीही बीड आणि परभणीचे पर्यटन करू नये, असेही फडणवीस म्हणाले.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, परभणीमध्ये घडलेली घटना अत्यंत गंभीर



आहे. एखाद्या घटनेच्या गांभीर्य तिथे कोण गेला आहे, त्यापेक्षा आपण त्याला कसे रिस्पॉन्स करतो यावरून ठरते. प्रत्येकच ठिकाणी मुख्यमंत्र्यांनी जावे असे होत नाही. घटना महत्त्वाची होती म्हणूनच उपमुख्यमंत्री अजित पवार त्या ठिकाणी केले होते. कोणतीही घटना घडल्यावर विरोधी पक्ष आणि सत्तेतील मंत्र्यांनी तिकडे जावे. माझी हरकत नाही. पण तिथे जाऊन राजकारण करू नये. पर्यटन करू नये, असेही ते म्हणाले.

**गडचिरोलीचे पालकमंत्रीपद घेण्याची माझी इच्छा**

यावेळी देवेंद्र फडणवीसांना बीडचे पालकमंत्रीपद घेण्याबाबत विचारले असता, ते म्हणाले की, पालकमंत्र्याबाबत चंद्रशेखर बावनकुळे आणि उर्वरीत पान ३ वर

# साईबाबांच्या झोळीत ८१९ कोटींचे दान!

## वर्षभरात ३ कोटी भाविकांची हजेरी | गेल्या वर्षीच्या तुलनेत १५ कोटींचे अधिक उत्पन्न

शिर्डी : प्रतिनिधी

**फकिराचे जीवन जगलेले आणि देश-विदेशातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या साईबाबांच्या झोळीत या वर्षी भाविकांनी भरभरून दान टाकले आहे. शिर्डीच्या साईबाबा समाधी मंदिरात या वर्षभरात सुमारे तीन कोटींहून अधिक भाविकांनी हजेरी लावली. त्यांनी तब्बल ८१९ कोटी रुपयांची देणगी विविध माध्यमांतून दिली आहे. अद्याप वर्षअखेरीच्या जोडून आलेल्या सुट्ट्यांचे काही दिवस शिल्लक आहेत. तरीही गेल्या वर्षीच्या तुलनेत १५ कोटी रुपये अधिक उत्पन्न संस्थानला मिळाले आहे.**



साईबाबा संस्थानचा कारभार राज्य सरकारच्या अखत्यारित चालतो. विश्वस्त मंडळ नसल्याने न्यायालयाने नियुक्त केलेल्या तदर्थ समितीतर्फे कामकाज केले जाते. संस्थानच्या या वर्षीच्या अहवालाला विधिमंडळाच्या अधिवेशनात नुकतीच मंजुरी देण्यात आली आहे. त्यातून ही माहिती समोर आली. मंदिरात भेट दिलेल्या भाविकांनी ४५१ कोटी रुपयांची देणगी दानपेटीत टाकली, तर अन्य माध्यमांतून मिळून ८१९ कोटी ५७ लाख रुपये संस्थानला मिळाले आहेत. मागील वर्षापेक्षा त्यात १५ कोटी ६४ लाखांची भर पडली आहे. अर्थात वर्ष संपायला अद्याप वेळ आहे. शिवाय नाताळ आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी शिर्डीत लाखो भाविक भेट देत असल्याने या काळात देणगी आणखी वाढत असते.

उर्वरीत पान ३ वर

# वाघोलीत शेतकऱ्याच्या बंगल्यावर गोळीबार

## ■ गोळीबारामागचे कारण अस्पष्ट ■ आरोपीच्या शोधासाठी पथके रवाना



पुणे : प्रतिनिधी

**वाघोलीत एका शेतकऱ्याच्या बंगल्यावर गोळीबार करण्यात आल्याची घटना पहाटे घडली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. गोळीबारामागचे कारण समजू शकले नाही. पसार झालेल्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची सहा पथके रवाना झाली आहेत.**

याबाबत निलेश सुभाष सातव (वय ३३, रा. वडजाई वस्ती, डोमखेल-आव्हाळवाडी रस्ता, वाघोली) यांनी वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सातव शेतकरी आहेत. त्यांचा बंगला वडजाई वस्ती परिसरात आहे. बुधवारी पहाटे चारच्या सुमारास सातव यांच्या बंगल्याच्या खिडकीवर गोळीबार करण्यात आला. गोळीबारात खिडकीच्या काचा फुटल्या. गाढ झोपेत असलेले सातव कुटुंबीय गोळीबाराच्या आवाजामुळे जागे झाले. त्यांनी पाहणी केली. तेव्हा खिडकीच्या काचा फुटल्याचे लक्षात आले. तेव्हा घरात दोन उर्वरीत पान ३ वर

# भारत-पाकिस्तान सामना २३ फेब्रुवारीला

## आयसीसीकडून चॅम्पियन्स ट्रॉफीचं वेळापत्रक जाहीर



मुंबई : वृत्तसंस्था

**आयसीसीने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे वेळापत्रक जाहीर केले आहे. बीसीसीआय आणि पीसीबी यांच्यातील चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे. आयसीसीने यापूर्वीच ही स्पर्धा हायब्रिड मॉडेलमध्ये खेळवणार असल्याचे जाहीर केले होते. या स्पर्धेतील पहिला सामना न्यूझीलंड आणि यजमान पाकिस्तान यांच्यात कराची येथे होणार आहे. तर बहुप्रतिक्षित असा भारत-पाकिस्तान सामना २३ फेब्रुवारीला होणार आहे.**

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेला १९ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे. पहिला सामना न्यूझीलंड आणि यजमान पाकिस्तान यांच्यात कराची येथे होणार आहे. फायनल ९ मार्च रोजी होणार आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे टीम इंडिया आपले सर्व सामने दुबईत खेळणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना २३ फेब्रुवारीला दुबईत होणार आहे. तर यजमान पाकिस्तानमधील रावलपिंडी, कराची आणि लाहोर या तीन शहरांमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने खेळवले जाणार आहेत.

पाकिस्तानमध्ये होणाऱ्या या स्पर्धेसाठी भारत सरकारने टीम इंडियाला पाकिस्तानात जाण्याची परवानगी दिली नाही.गेल्या अनेक दिवसांपासून दोन्ही देशांच्या क्रिकेट बोर्डांमध्ये या मुद्द्यावरून वाद सुरू होता. त्यामुळे स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर होण्यास सुमारे महिनाभराचा उशीर झाला आहे. आता ही स्पर्धा हायब्रिड मॉडेलमध्ये खेळण्यास सहमती दिल्यानंतर आयसीसीनेही वेळापत्रकाला मान्यता दिली आहे.

**चॅम्पियन्स ट्रॉफीचे वेळापत्रक**

१९ फेब्रुवारी- पाकिस्तान विरुद्ध न्यूझीलंड, कराची

उर्वरीत पान ३ वर




# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# एआय मॉर्फिंगपासून वाचायचे कसे?

**मोबाईल तंत्रज्ञान अधिक प्रगत आणि वेगाने विकसित होत असून, मोबाईलमध्ये 'एआय तंत्रज्ञान' अद्ययावत करण्यात आले आहे. त्यामुळे फोटो मॉर्फिंगसह अनेक कामे सोपी झाली आहेत. मात्र, एआयमुळे सहज सोप्या पद्धतीने होणाऱ्या फोटो मॉर्फिंगसंदर्भातील गुन्ह्यांच्या तक्रारींची वाढती संख्या पाहता पोलिसांच्या सायबर विभागासमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे.**



- पुष्पगुच्छाऐवजी येतोय मद्याचा प्याला : मोबाईलमध्ये असणाऱ्या तंत्रज्ञानामुळे फोटो मॉर्फिंग करणे सोपे झाले आहेत. एखाद्याचा पुष्पगुच्छ देतानाचा फोटो एडिट करून पुष्पगुच्छ ऐवजी हातात मद्याचा प्याला ठेवता येतो. यासह अनेक आक्षेपार्ह बदल एका क्लिकवर करता येतात. यापूर्वी अशा प्रकारे मॉर्फिंग करण्यासाठी फोटोशॉपचा वापर केला जात असे; मात्र जाणकार मंडळीच त्याव्दारे मॉर्फिंग करू शकत होती. आता मोबाईलमध्ये आलेल्या एआय सुविधेमुळे कोणीही एका क्लिकवर फोटो मोर्फिंग करू शकते. जे पुढील काळात धोकादायक ठरणार आहे.
- बदनामीसाठी वापर : 'एआय'च्या मदतीने केलेले मॉर्फिंग सहजपणे ओळखता येत नाही. फोटो एडिट करताना एआयकडून अनेक छोटे छोटे बदल आपोआप केले जातात. सध्या प्रत्येकाचे फोटो सोशल मीडियावर उपलब्ध आहेत. या फोटोंमध्ये बदल करून बदनामीदेखील केली जाऊ शकते. त्यामुळे सोशल मीडियावर फोटो अपलोड करताना यापुढे अधिक खबरदारी घ्यावी लागणार आहे.
- एआय जनरेटेड कंटेट : एआयच्या मदतीने एडिट केलेल्या फोटोच्या खाली एआय जनरेटर कंटेंट असा मार्क येतो. मात्र, फोटोखाली अगदी कोपऱ्यात असलेला हा मार्क फोटो क्रॉप किंवा इतर टूलच्या मदतीने सहजरित्या घालवता येतो. ज्यामुळे फोटो एडिट आहे, की खराखुरा, हे समजत नाही.


## एआय म्हणजे काय?

- आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारित ही जगभरात वापरली जाणारी ही टेक्नॉलॉजी आहे. मानवी बुद्धिमत्तेसारखे शिकण्याची क्षमता मशिन्समध्ये आणि तिच्या सॉफ्टवेअर प्रोग्रॅम्समध्ये तयार करण्यासाठी वापरले जाणारे हे तंत्र आहे. आधुनिक तंत्रज्ञान युगात कृत्रिम बुद्धिमत्तेचा अनेक क्षेत्रांत वापर केला जातो आहे. मोबाईलमध्ये असलेल्या एआय तंत्रज्ञानामुळे किचकट कामे सोपी झाली आहेत.
- फोटो 'मॉर्फ' करून बदनामी किंवा फसवणूक केल्याच्या सायबर विभागाकडे दररोज तक्रारी येत आहेत. यातच आता मोबाईलमध्ये आलेल्या एआयच्या मदतीने फोटो मॉर्फिंग करणे सोपे झाले आहे. मात्र, याचा दुरुपयोग होण्याची जास्त शक्यता आहे. एखाद्याचा फोटो आक्षेपार्ह पद्धतीने मॉर्फ करून व्हायरल करणे, हा कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे फोटो एडिट करण्यासाठी एआयचा वापर करताना खबरदारी घेणे गरजेचे आहे, असे सायबर पोलिसांनी म्हटले आहे.

# सोशल मीडियावर सुरक्षित राहण्याच्या 8 टिप्स!

सोशल मीडियाची क्रेझ आणि वापर इतका वाढला आहे की, कित्येक युजर्स त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील प्रत्येक लहान-मोठा आनंद सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर करतात. Facebook, Twitter, Instagram, लिंक्डइन सारख्या प्लॅटफॉर्मवर युजर्स पोस्टद्वारे त्यांचे फॉलोअर्स आणि मित्रांसह फोटो, व्हिडीओ किंवा विचार शेअर करतात. इतकंच नाही तर इतर युजरने शेअर केलेली पोस्ट आवडल्यास ती शेअरही करतात. पण, अनेकदा सोशल मीडियावर माहिती किंवा पोस्ट शेअर करताना युजर्स आवश्यक ती काळजी घेत नाही. ज्याचे पुढे त्यांना गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात.

1. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापरल्यानंतर, आपल्या प्रोफाइलमधून लॉग आउट करण्याचे लक्षात ठेवा. जेणेकरून कोणीही तुमची प्रोफाइल वापरू शकणार नाही. तसेच, तुमचे खाते हॅक होण्याचा धोका राहणार नाही.
2. तुमची कोणतीही माहिती सार्वजनिक करू नका. म्हणजेच, पब्लिक सर्चपासून तुमचे प्रोफाईल ब्लॉक करा.
3. तुमचे सोशल मीडिया क्रेडेन्शियल्स म्हणजे युजरनेम आणि पासवर्ड कोणाशीही शेअर करू नका.
4. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अनोळखी युजर्सच्या फ्रेंड रिक्वेस्ट कधीही Accept करू नका. जर तुम्ही एखाद्या युजर्सला ओळखत असाल तर फक्त त्यांची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारा.
5. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर फोटो, स्टेटस शेअर करण्यापूर्वी, प्रत्येक छोट्या गोष्टीची काळजी घ्या. असे केल्यास तुमची कोणतीही वैयक्तिक माहिती चुकीच्या व्यक्तीकडे जाणार नाही.
6. तुमच्या सोशल मीडिया प्रोफाइलवर तुमच्या घराचा आणि ऑफिसचा पत्ता आणि लोकेशन कधीही शेअर करू नका.
7. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर तुम्हाला पाठवलेल्या कोणत्याही संशयास्पद लिंक्स उघडू नका. असे केल्याने तुमची क्रेडेन्शियल्स सायबर गुन्हेगारांच्या हाती जाऊ शकतात आणि तुमचे खाते हॅक होऊ शकते.
8. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मची गोपनीयता सेटिंग्ज High level वर किंवा Restricted स्तरावर सेट करा.



# यु आर अंडर डिजिटल अरेस्ट!

**इंटरनेटचा आयुष्यात शिरकाव झाल्यामुळं आयुष्य सोपं झालं आहे, पण त्याचबरोबर अडचणींमध्येही वाढ झाली आहे. ऑनलाइन घोटाळ्यांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. हे घोटाळेबाज रोज वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब करत आहेत. डिजिटल अरेस्ट हा आता त्यात एक नवीन प्रकार उदयाला आला आहे. डिजिटल अरेस्ट म्हणजे डिजिटल स्वरुपात अटक. या प्रकारात एखादी व्यक्ती पोलीस असल्याचं सांगून किंवा ईडी किंवा सीबीआयचा अधिकारी असल्याचं सांगून मेसेज पाठवतो किंवा थेट व्हीडिओ कॉल करतो. तुम्हाला ड्रग्स किंवा मनी लॉँड्रिंगच्या प्रकरणात डिजिटल अरेस्ट करत असल्याची बतावणी करतो. कधी म्हणतो की, तुम्ही परदेशात जे सामान पाठवलं आहे ते बेकायदेशीर आहे. मी असं काही पाठवलं नाही असं सांगितलं, तर तुमचं आधार कार्ड आणि फोन नंबर त्यावर आहे असं सांगण्यात येतं. त्यानंतर बराच वेळ ती व्यक्ती तुम्हाला व्हॉट्स अप किंवा स्काइप कॉलवर राहायला सांगते. कारण तुम्हाला अटक झाली आहे, असं तो सांगतो.**

आता या तथाकथित गुन्ह्यातून तुम्हाला जामीन हवा असेल तर पैशाची मागणी केली जाते. समोरचा व्यक्ती म्हणतो की पैसे पाठवा म्हणजे केस करणार नाही. व्हिडीओ कॉलवर पोलिसांच्या गणवेशात एक व्यक्ती बसलेला असतो. इतकंच काय तर अगदी पोलीस ठाण्यासारखं वातावरणसुद्धा असतं. मग लोक घाबरून पैसे पाठवतात आणि तिथे घोटाळेबाजांचा उद्देश साध्य झालेला असतो. मात्र डिजिटल अरेस्ट नावाचा कोणताही प्रकार अस्तित्वात नाही हे लक्षात घेणं अतिशय महत्त्वाचं आहे. तुम्हाला कोणीही अशा प्रकारे अटक करू शकत नाही.

## एआयचा वापर

आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे एआय हा शब्द परवलीचा झाला आहे. एआयचा वापर करून तुम्ही लोकांचा चेहरा बदलू शकता, आवाज बदलू शकता. म्हणजे एआयचा वापर करून तुम्ही आर्थिक अडचणीत आहात किंवा तुमचा फोन हरवला आहे, असं खोटं सांगून तुमच्या आई- वडिलांना किंवा नातेवाईकांना फोन केला किंवा पैसे मागितले तर, या धोक्यांना खरंतर काहीच सीमा नाही. त्यामुळे सरकारला एआयबाबत नियमावली आणणं आवश्यक आहे.

## अनुभवाचे बोल वाचा...

काही दिवसांपूर्वी चिन्मय केळकर यांनी फेसबूकवर एक सविस्तर पोस्ट लिहून या प्रकाराबद्दल सांगितलं. त्यांच्याबरोबर 'डिजिटल अरेस्ट'चा प्रयत्न झाला होता. पण वेळीच लक्षात आल्याने पुढचा धोका टळला. ते फेसबूक पोस्टमध्ये लिहितात, की सायबर क्राइम ब्रँचमधून आलेला संदेश एक व्यक्ती माझ्यापर्यंत पोहोचवत होती. डार्क वेबच्या जगात माझी माहिती आणि वैयक्तिक दुवे वापरून काही गैरव्यवहार झालेले असण्याची शक्यता ती नोंदवत होती. त्या विरोधात मी सायबर गुन्हे विभागाकडे गुन्हा नोंदवला पाहिजे, असं रोखठोक आवाहनही त्यात होतं. त्याचबरोबर तसं मी न केल्यास माझ्यावर त्या कथित गैरव्यवहारात मी सामील असल्याचं गृहित धरून कायदेशीर कारवाई केली जाईल अशी गर्भित धमकीही होती. या संभाषणाच्या काही दिवस आधी चिन्मय यांनी डार्क वेबबद्दल माहिती घेतल्यामुळे त्यात तथ्य आहे, असं त्यांना वाटलं. इंटरनेटच्या वापराबद्दल आपली माहिती विविध साईट्सला दिल्याबद्दल अनेक प्रश्न त्यांना विचारण्यात आले. आपली वैयक्तिक माहिती न विचारता वापरली म्हणून गुन्हा नोंदवावा आणि त्यासाठी काय पायऱ्या आहेत हेही चिन्मय यांना सांगण्यात आलं. नंतर त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर जबाब नोंदवायला सांगितलं. मग वरिष्ठ अधिकारी बोलू लागले. हे सगळे 'अधिकारी' हैदराबाद क्राइम ब्रँचचे असल्याचं सांगण्यात आलं. तेव्हा चिन्मय यांना पहिला संशय आला. संशय आल्यानंतरही चिन्मय यांनी संवाद सुरू ठेवला. चिन्मय पुण्यात असल्याने तक्रार नोंदवण्यासाठी ऑनलाइन यावं लागेल असं त्यांना सांगण्यात आलं. मग व्हिडीओ कॉल सुरू झाला. व्हिडीओ कॉलवर प्रश्नांचा भडिमार करण्यात आला. चिन्मय यांनी त्याचीही उत्तरं दिली. नंतर आधार कार्डाचा नंबर वारंवार विचारण्यात आला. चिन्मय यांनी तोही दिला. पुन्हा प्रश्नांची सरबत्ती झाली आणि समोरची व्यक्ती म्हणाली की, तुम्ही ७०० कोटींचा घोटाळा केला आहे. तेव्हा हा सगळा प्रकार खोटा असल्याची चिन्मय यांना खात्री पटली. ते त्या व्यक्तीच्या तोंडावरच हसू लागले. ती व्यक्ती संतापली. 'मिस्टर चिन्मय तुम्ही हसताय काय?' असा प्रश्न त्या व्यक्तीने संतापून विचारला. चिन्मय यांनी पोलिसात तक्रार दाखल करतोय, असं सांगितलं आणि मग कॉल कट झाला. वेळीच लक्षात आल्याने पुढचा धोका टळला.

## हे लक्षात ठेवा

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे असं काही झालं तर थोडं थांबा, विचार करा, आपल्याबरोबर काही चुकीचं होत नाहीये ना हा विचार करा. घोटाळेबाजांच्या प्रश्नांना भांबावून जाऊन उत्तरं देऊ नका. अशा प्रकरणात सजग राहण्याची अतिशय गरज आहे. जर तुम्हाला कोणी ब्लॅकमेल करत असेल, तर त्याची तक्रार करा. हा सगळ्यात उत्तम उपाय आहे. एकदा पैसे गेले की, पैसे परत आणणं पोलिसांना कठीण होतं. जे लोक हे घोटाळे करतात, त्यांचा माग घेणंही पोलिसांना अतिशय कठीण जातं. कारण हे लोक दुसऱ्या देशात असतात, कधी दुसऱ्या राज्यात असतात. त्यामुळे पोलिसांना कार्यक्षेत्राची समस्या येऊ शकते. घोटाळेबाजांकडे वेगळ्याच व्यक्तीच्या नावाचे सिमकार्ड असतात. कधी सेकंड हँड फोन किंवा चोरीचा फोन असतो. वेगळ्याच आयडीने तयार केलेलं अकाऊंट असतं. एकदा पैसे मिळाले की, ते या सगळ्या गोष्टी नष्ट करतात. ज्या लोकांच्या नावाचं ॲड्रेस प्रुफ, फोटो वगैरे चोरला असतो, पोलीस त्यांच्याकडे जातात आणि गुन्हेगार तसेच मोकाट फिरत असतात.

## या गोष्टींचीही काळजी घ्या

डिजिटल अरेस्टशिवाय ऑनलाइन घोटाळ्याचे अनेक प्रकार आहेत. कधी एखाद्या अनोळखी क्रमांकावरून व्हिडीओ कॉल येतो. जर दोन- तीन वेळा फोन करूनही तुम्ही फोन उचलला, तर स्क्रीनवर काहीच येत नाही. अचानक एक विवस्त्र महिला स्क्रीनवर येते आणि ब्लॅकमेलिंगची सुरुवात होते. पैसे पाठवले नाही, तर स्क्रीनशॉट पाठवू अशी धमकी देण्यात येते. काही लोकांना असे इमेल येतात जे एकदम सरकारी दिसतात, त्यावर सरकारी शिक्का असतो. सीबीआय किंवा तत्सम संस्थेने त्यांना नोटीस पाठवली आहे आणि आता तपासणी होणार असं त्यात सांगितलेलं असतं. हाही एका प्रकारचा घोटाळा आहे. कर्ज देणाऱ्या ॲप्सचा तर प्रचंड सुळसुळाट झाला आहे. तिथे लोकांना सहज कर्ज उपलब्ध होतं, मात्र त्यानंतर त्यांना हप्त्यासाठी ब्लॅकमेल केलं जातं. या प्रकारामुळे अनेक लोकांना जीव गमवावा लागला आहे.

## मग करायचं काय?

केंद्र सरकारने ttps://cybercrime.gov.in/webform/ Crime_NodalGrivanceList.aspx नावाचं एक पोर्टल तयार केलं आहे. तुमच्याबरोबर जर इंटरनेट, फोन, किंवा कोणत्याही पद्धतीने घोटाळा झाला असेल, तर तक्रार नोंदवता येते. प्रत्येक राज्यासाठी वेगळा क्रमांक दिला आहे. त्यामुळे फोनवरूनही तक्रार नोंदवू शकता.महाराष्ट्रासाठी 022-22160080 हा क्रमांक आहे. दिल्ली पोलिसांनीसुद्धा 1930 क्रमांकाची हेल्पलाइन सुरू केली आहे. याशिवाय थेट 112 क्रमांकावरही फोन करू शकता. अशा घोटाळ्यांविरुद्ध



तक्रार नोंदवण्यासाठी सुरू झालेल्या हेल्पलाइनची माहिती घ्या आणि ते सगळे नंबर्स सेव्ह करा. आपल्या कुटुंबियांनासुद्धा असं करायला सांगा. जितकी लवकर तक्रार दाखल कराल, तितके पैसै परत मिळण्याच्या शक्यता वाढते.


## बँक काय मदत करू शकते?

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, तुमचं कार्ड क्लोन करून पैसे काढले असतील, तर तुम्ही पहिल्या तीन दिवसांत बँकेला कळवलं तर तुमचे सगळे पैसे परत मिळतात. ४-७ दिवसांच्या आत कळवलं तर जास्तीत जास्त ५ हजार ते २५ हजारांपर्यंत नुकसान सोसावं लागतं. त्यातले कमीत कमी पैसे बँक स्वतःकडे ठेवते आणि इतर पैसे ग्राहकांना परत करते. सात दिवसांनंतर कळवलं तर मात्र एक रुपयाही परत मिळत नाही. तुम्ही ओटीपी दिला किंवा चुकीच्या व्यवहाराची माहिती बँकेला दिली नाही तर त्याचं नुकसान तुम्हाला सहन करावं लागेल. ती ग्राहकाची जबाबदारी आहे की नाही, निष्काळजीपणा केला की नाही, हे सगळं सिद्ध करणं बँकेचे काम आहे.

# डिजिटल अरेस्ट : एक प्रकारचा घोटाळा

## 'आयफोरसी'ने नागरिकांना केले आवाहन

**केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सीबीआय), पोलीस, सीमाशुल्क विभाग (कस्टम्स), सक्तवसुली संचालनालय (ईडी) किंवा न्यायाधीश व्हिडीओ कॉलद्वारे लोकांना अटक करत नाहीत, असे भारतीय सायबर गुन्हे समन्वयन केंद्राने (आयफोरसी) सांगितले आहे.**




डिजिटल अटकेचे वाढते प्रकार ध्यानात घेऊन आयफोरसीने नागरिकांसाठी जारी केलेल्या सार्वजनिक सूचनांमध्ये याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. अशा प्रकारे कुणी डिजिटल अटक करण्याचा प्रयत्न करीत असेल तर तो एक प्रकारचा घोटाळा आहे, असे 'आयफोरसी'ने स्पष्ट केले आहे. इंटरनेटचा वापर करून केलेल्या अशा प्रकारच्या कोणत्याही इशाऱ्यांना सर्वसामान्य नागरिकांनी बळी पडू नये. नागरिकांनी घाबरून न जाता सजग राहावे, असे आवाहनही संस्थेने केले आहे. अशा प्रकारच्या घटना घडल्यास नागरिकांनी केंद्रीय हेल्पलाइन क्रमांक १९३० किंवा www.cybercrime.gov.in या वेबसाइटवर त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन 'आयफोरसी'ने केले आहे.

सायबर चोर नागरिकांना संपर्क करून पोलीस, इडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग, लष्करी अधिकारी असल्याची बतावणी करतात. ड्रग्ज, देशविघातक कृत्य, बनावट पासपोर्ट, दहशतवाद्यांशी आर्थिक व्यवहार, बँक खात्यामध्ये संशयास्पद व्यवहार, आधारकार्ड-सीमकार्डचा गैरवापर झाल्याचे भासवून गुन्हा दाखल झाला असल्याचे सांगितले जाते. तुम्हाला येण्याची गरज नसून आहात त्या ठिकाणी किंवा एखाद्या हॉटेलच्या खोलीत 'डिजिटल अटक' करावे लागेल, असे सांगतात. २४ तासांपर्यंत संबधित नागरिकाला कुणाच्याही संपर्कात न राहता व्हिडीओ कॉलवर बंदिस्त राहायला सांगितले जाते. या कालावधीत व्हिडीओ कॉलमध्ये न्यायालयाचा परिसर दाखवून खटला चालवल्याचे भासवतात. मदत करण्याच्या बहाण्याने, गुन्ह्यात वाचवण्यासाठी पैशाची मागणी केली जाते.

## २४ तासांत एक कोटी वाचवले

मुंबई पोलिसांनी काही दिवसांपूर्वी १९३० या सायबर हेल्पलाइनवर आलेल्या डिजिटल अटक आणि अन्य सायबर फसवणुकीच्या तक्रारींमध्ये २४ तासांत १,०९,५८,७२७ रुपये इतकी रक्कम वाचवली. तत्काळ तक्रारीमुळे नागरिकांची रक्कम वाचवण्यात पोलिसांना यश आले आहे. २०२४ मध्ये आतापर्यंत मुंबई सायबर पोलिसांनी वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये सुमारे ११४ कोटी रुपये वाचवले आहेत.



## शॉर्ट न्यूज

### बालकहत्या अंधश्रद्धेच्या अंगाने चौकशी करावी

**कोपरगाव :** तालुक्यातील चासनळी येथे शुक्रवारी गोदावरी नदीपात्रात पाच ते सहा वर्षांच्या मुलाचा मृतदेह आढळून आला. या प्रकरणात अंधश्रद्धेच्या अंगाने पोलिसांनी चौकशी करावी. अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी कोपरगाव तालुका पोलिस स्टेशनचे निरीक्षक संदीप कोळी यांच्याकडे केली आहे. चासनळी हे धार्मिक तीर्थक्षेत्र आहे.अमावास्या-पौर्णिमेला अनेक भाविक दूरवरून गोदावरीत स्नानाला येतात. भंगलेल्या मूर्ती नदीत विसर्जित करण्यासाठीही दूरचे लोकही हे ठिकाण निवडतात.

### भीमसैनिकांचा निळा एल्गार मोर्चा

**अकोले :** परभणी येथे संविधानाचे प्रतीक असलेल्या शिल्पाची तोडफोड करणाऱ्या व्यक्तीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच संविधानाचे रक्षक असणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या पोलिस निरीक्षक, एलसीबीचे अधिकारी व मृत्यूशी संबंधित असणाऱ्या अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबनाची कारवाई करावी, या मागणीसाठी अकोले तालुक्यातील पुरोगामी आंबेडकरी चळवळीच्या वतीने विजय वाकचौरे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता.

### धमकी देणाऱ्यावर कारवाईची मागणी

**नगर :** पोलिस ठाण्यात दाखल केलेला गुन्हा मागे घेण्यासाठी जिवे मारण्याची धमकी देणाऱ्यांवर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करावी, अशी मागणी रोहन जयेंद्र चव्हाण, जितेंद्र सुरेश (दोघे रा. नालेगाव) यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, माझ्यासह कुटुंबीयांवर प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

### काष्टीत गावठी दारू अड्ड्यावर छापा

**श्रीगोंदा :** पोलिसांनी काष्टी येथे गावठी दारू अड्ड्यावर तसेच श्रीगोंदा शहरात एक घरगुती गॅस घेऊन चाललेला टेम्पो पकडला. या दोन्ही कारवाईत पोलिसांनी ७८ लाख २२ हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आणि सहा जणांना ताब्यात घेतले. त्यांच्यावर वेगवेगळ्या स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी पोलिस ठाण्यात भेट देऊन कारवाईच्या पुढील सूचना केल्या, पोलिस निरीक्षक किरण शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली.

### टेम्पो जेसीबीच्या धडकेत तरुण ठार

**राहुरी :** तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथून वडनेरकडे मोटारसायकलवर जात असलेल्या तरुणाला कणगर येथे मालवाहतूक टेम्पो व जेसीबीची धडक बसल्याने दुचाकीवरील तरुण जागीच ठार झाल्याची घटना २३ डिसेंबर रोजी सायंकाळच्या दरम्यान घडली. या घटनेतील मयत तरुण सोमनाथ बाबूराव बलमे हा तरुण मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. २३ डिसेंबर रोजी सायंकाळी ५. ३० वाजे दरम्यान सोमनाथ बलमे हा तरुण त्याच्या मोटारसायकलवर राहुरी फॅक्टरी येथून वडनेरकडे जात होता.

# पाच दशकांपूर्वीच्या ‘जंगली हॉटेल’ची मोहीनी आज ही कायम!

## एलजी कंपनीच्या जागेवर उभे होते जंगली हॉटेल | जुन्या राजकीय नेत्यांना नेहमीच या हॉटेलची भुरळ

**शिरूर : सतीश डोंगरे**

**पुणे- नगर रस्त्यावरील रांजणगाव एमआयडीसीतील जंगली हॉटेलचे अस्तित्व संपून आता जवळपास २० वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी आजही या हॉटेलच्या नावाची मोहिनी कायम आहे. शिरूरमध्ये आल्यानंतर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह अनेक राजकीय नेते जाहिर सभांमधून वारंवार जंगली हॉटेलचा ओघावता उल्लेख करतात यातूनच या हॉटेलचे महत्व अधोरेखित होते. बदलत्या काळाच्या ओघात हे हॉटेल बंद झाले असले तरी या हॉटेलच्या आठवणी अनेकांनी हृदयाच्या कप्प्यात जपल्या आहेत.**



पुणे-नगर रस्त्यावर कारेगाव, रांजणगाव आणि ढोकसांगवीच्या शिवेवर साधारण १९७८ मध्ये ढोकसांगवी येथील लक्ष्मणअण्णा पाचंगे यांनी या हॉटेलची मुहुर्तमेढ रोवली. त्यावेळी हा हॉटेलचा संपूर्ण परीसर निर्मनुष्य होता. जवळपास कुठलीही लोकवस्ती नाही. हॉटेलच्या समोरच रस्त्याच्या दुतर्फा जुनी भली मोठी वडाची दाट झाडे होती. एकूणच हा जंगल सदृष्य परीसर होता. यावरुनच या हॉटेलला जंगली हॉटेल हे नांव पडल्याचे सांगण्यात येते.

त्यावेळी उद्योग धंद्यासाठी परीस्थिती बिकट होती. व्यवसाय वाढण्याच्या दृष्टीने लोकसंख्या पण मोजकीच होती. परीस्थिती सगळ्यांचीच तशी बेताची. हॉटेल मध्ये जाऊन खायचं म्हणजे तसं दिव्यच. अशाही परीस्थितीत लक्ष्मण अण्णांनी मोठ्या धाडसाने हे हॉटेल सुरु केले. वाळूच्या गाड्यांचे चालक, बिगारी आणि याच गाड्यांवर वाळू चाळण्यासाठी जाणारे कष्टकरी मजूर हे श्रमजीवी लोक या हॉटेलचे मुख्य ग्राहक. तुरळक मालवाहतूक गाड्या याठिकाणी थांबा घेत. भेळभत्ता, गोडीशेव रेवडी, लाडू आणि गरमागरम भजी,ॲल्युमिनीयमच्या ग्लास मधील पाणी याशिवाय वाफाळलेला चहा पिऊन तरतरीत होऊन हे कष्टकरी मजूर दिवसभराच्या कामाला निघत. जंगली हॉटेल हा या श्रमजीवी लोकांचा मोठा आधार होता. लक्ष्मण अण्णांनी कधी कुणाला पैसे नाहीत म्हणून चहा पाण्यापासून अडवले नाही. अण्णांनी ह्या व्यवसायात भरपूर कष्टाने, मेहनतीने आणि सचोटीने आपलं स्थान निर्माण केले होते.

जंगली हॉटेल आणि प्रवाशांच एक नातं होतं ते तब्बल पाच दशके जपलं गेलं. जंगली हॉटेल या थांब्याची ओळख केवळ स्थानिक पातळीवरच नव्हे तर राज्यातील प्रवाशांना आणि चालक- वाहकांनाही त्याची ओळख होती. जंगली हॉटेल हा केवळ एका शब्दाचा तो पत्ता होता. विशेष म्हणजे त्याकाळी कुठलाही बोर्ड, फलक, पाटी नाही तरीही जंगली हॉटेलची ओळख होती कदाचित असे ठिकाण हे राज्यातील त्यावेळचे एकमेव ठिकाण असावे. त्यातून जंगली हॉटेल हे नांव दळणवळणाच्या क्षेत्रात एक दंतकथा बनून राहिले होते.

पुढे १९९५-९६ मध्ये रांजणगाव एमआयडीसीचे वारे आले जागतिक दर्जाच्या मोठमोठ्या कंपन्या उभ्या राहिल्या अन् त्याखालीच जंगली हॉटेल या खोपटाचा शेवट झाला. या हॉटेलचे अस्तित्व संपले तरी आजही कारेगाव, रांजणगाव आणि ढोकसांगवीकरांच्या मनात या हॉटेलच्या आठवणी जिवंत आहेत.

### जंगली हॉटेलच्या आठवणी पुसणार नाहीत !

**अनेक आव्हाने समोर असतानाही आमच्या वडीलांनी कठीण काळात जंगली हॉटेल जिद्दीने चालविले. उत्तम दर्जा, जिभेवर रेंगाळणारी अवीट चव, रास्त दर, स्वच्छ्ता आणि आपुलकी ह्या जंगली हॉटेलच्या वैशिष्ट्यांनी त्यावेळच्या कष्टकरी, श्रमजीवी ग्राहकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण केले होते. या हॉटेल मुळे आमचे कुटुंब चालण्यासाठी तेंव्हा मोठी मदत झाली. त्यांच्या बद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. १३ मे २००५ मध्ये अण्णांचे निधन झाले पण आजही २२ वर्षांनी जुने लोक जंगली हॉटेल आणि अण्णांची आठवण काढतात. जंगली हॉटेलच्या आठवणी ह्या सहजासहजी पुसणार नाहीत अण्णांनी निर्माण केलेल्या विश्वासाची ही पोचपावती म्हणावी लागेल.**

**ज्ञानेश्वर पाचंगे**
**लक्ष्मणअण्णा यांचे चिरंजीव**

वाचकांच्या लेखणीतून

# पावसाच्या बिया!

राजाभाऊ गवांदे (१९२९-२०१५) न्यायिक, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातले महान व्यक्तीमत्व होते. ते मूळचे अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगावचे. कोपरगाव, अहमदनगर आणि पुणे येथे त्यांचे शिक्षण झाले. १९५२ ते १९५८ पर्यंत त्यांनी कोपरगाव येथे वकिली केली. पुढे न्यायाधीश, सहन्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांनी धुळे, जळगाव, सांगली, पुणे, ठाणे आदी ठिकाणी काम केले. १९८८ पासून ते कायमचेच ठाणेकर झाले.

२००५ साल असावे. आम्हीही त्यावेळी कळवा येथेच राहत होतो. तेथील जवाहर वाचनालयात मी कार्यकारी मंडळात संचालक होतो त्यावेळी कसल्या तरी प्रसंगानिमित्त त्यांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते.

मध्यम उंची. गोरा रंग. स्वच्छ टापटिपीचे शर्टपँट घातलेले. असे ते रुबाबदार व्यक्तीमत्व पहिल्यांदाच पाहिले. बोलणे स्वच्छ आणि साफ होते. आपल्या पांढऱ्या केसांना उद्देशून ते म्हणाले, डोक्यावर हे पिकलेले केस नसून जीवनातल्या अनुभवांची फुललेली ती पौर्णिमा आहे. वयोमानामुळे डोक्यावरच्या पिकलेल्या केसांना पांढऱ्याशुभ्र चांदण्याची त्यांनी दिलेली उपमा अगदी चपखल वाटली. एखादा उर्दू शेरच ऐकतो आहे अशी माझी भावना झाली. त्यातून राजाभाऊंची रसिकता आणि साहित्यिक गुणांची एकाच क्षणात जाणीव झाली. तो दिव्य क्षण होता. तो केवळ भाग्यानेच एखाद्याला लाभतो. आम्हा श्रोत्यांना तो लाभला.

पुढे आर्चिस नामक ग्रंथ वाचण्यात आला. या ग्रंथांत पूज्य साने गुरुजींवर मोठमोठ्या साहित्यिक मंडळींचे लेख आहेत. त्यात राजाभाऊंचाही एक लेख आहे. पावसाच्या बिया असे त्या लेखाचे शीर्षक असावे असे वाटते. आता नीट आठवत नाही.



राजाभाऊंवर राष्ट्रसेवा दलाचे संस्कार होते. साने गुरुजींचा सहवासही त्यांना घडला होता.

एकदा साने गुरुजी आणि राजाभाऊ ग्रामीण भागातून रस्त्याने चालले असता एकाएकी पाऊस येऊ लागला. गाराही पडू लागल्या. म्हणून त्या दोघांनी रस्त्याजवळील शेतकऱ्याच्या झोपडीचा आश्रय घेतला. झोपडीच्या अंगणात त्या शेतकऱ्याची परकरी वयातली मुलगी पावसात भिजत खेळत होती. थोड्या वेळाने त्या मुलीने परकरात धरून काही तरी आणले आणि आईला म्हणाली, आई, ह्या बघ पावसाच्या बिया! परकरात झेललेल्या गारांना ती मुलगी पावसाच्या बिया म्हणाली होती! किती नावीन्यपूर्ण उपमा होती ती! किती काव्यमय प्रसंग होता तो! राजाभाऊंच्या रसिक दृष्टीने ते वेळीच टिपले. हे विशेष!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# नव्या दुचाकींसाठी नवीन क्रमांकाची मालिका सुरू

## पसंती क्रमांकासाठी २६ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**नगर : प्रतिनिधी**



**दुचाकी संवर्गातील नवीन वाहनांकरिता नवीन वाहन क्रमांक मालिका सुरू करण्यात येत असून इच्छुक अर्जदारांनी २६ डिसेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत पसंती क्रमांकाच्या विहीत शुल्काच्या धनाकर्षासह अर्ज चांदणी चौकातील नवीन इमारतीत खिडकी क्रमांक २० येथे जमा करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी केले आहे.**

अर्ज सादर करताना वाहन नावावर असलेल्या व्यक्तीच्या नावाच्या अर्जासोबत पत्त्याचा पुरावा, पॅन कार्ड, आधार कार्डला संलग्न असलेला भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. पसंती क्रमांक धनाकर्ष अहमदनगर कॅम्प ब्रँच, ट्रेझरी ब्रँच कोड नं १३२९६ करिता देय असणे आवश्यक आहे.

एका पसंती क्रमांकासाठी एकच अर्ज आला असेल त्यांची व एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोनपेक्षा जास्त अर्ज आले असतील त्यांच्या पसंती क्रमांकाची यादी २६ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता वाजता चांदणी चौक येथील नवीन इमारतीत सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल. एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोन पेक्षा जास्त अर्ज आलेल्या यादीमधील पसंती क्रमाकांसाठी ज्यांनी अर्ज केला आहे, अशा अर्जदारांनी २७ डिसेंबर रोजी दुपारी १.३० वाजता पसंती क्रमांक शुल्काच्या धनाकर्षाव्यतिरिक्त जादा रक्कमेचा धनाकर्ष बंद लिफाफ्यात सिलबंद करून खिडकी क्रमांक २० येथे जमा करून याच दिवशी दुपारी ३ वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे दालनात उपस्थित राहावे.

लिलावासाठी उपस्थित राहणाऱ्या अर्जदाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने ओळखपत्र व प्राधिकार पत्रासह हजर रहावे. कार्यालयात सादर झालेले जादा रक्कमेचे धनाकर्ष अर्जदारासमोर उघडण्यात येतील. ज्या अर्जदाराने जास्त रक्कमेचा धनाकर्ष सादर केला असेल त्याला तो पसंती क्रमांक देण्यात येईल व उर्वरित कमी रक्कमेचा धनाकर्ष संबंधित अर्जदारांना परत देण्यात येईल.

# धोंडिबा बिन्नर यांचा पोपट वळू ठरला चॅम्पियन

**अकोले : प्रतिनिधी**



अकोले तालुक्यातील राजूर येथे आयोजित करण्यात आलेल्या देशी-विदेशी व डांगी जनावरांच्या प्रदर्शनात केळी रुम्हणवाडी (ता.अकोले) येथील धोंडिबा किसन बिन्नर यांचा पोपट वळू चॅम्पियन ठरला. तर इगतपुरी तालुक्यातील धामणी येथील भाऊसाहेब राजाराम घोटे यांचा वळू उपविजेता ठरला.

राजूर ग्रामपंचायत, कृषी विभाग आणि जिल्हा परिषदेचा पशुधन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजूर येथील खंडोबा मंदिराच्या टेकडीवर डांगी जनावरांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शन उद्घाटनप्रसंगी आमदार डॉ. किरण लहामटे, माजी आमदार वैभव पिचड, पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडे आदी उपस्थित होते. प्रदर्शनासाठी अहिल्यानगर, नाशिक, पुणे या जिल्ह्यातील डांगी तसेच देशी-विदेशी जनावरे खरेदी विक्रीसाठी शेतकऱ्यांनी आणली आहेत. जनावरे खरेदीसाठी व्यापारी वर्गही मोठ्या संख्येने दाखल झाला आहे. जनावरांसाठी यावर्षी वेगवेगळ्या तालुक्यातील ९८ शेतकऱ्यांनी आपली डांगी जनावरे रिंगणात उतरवली होती.

# नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून दुष्काळमुक्त जिल्हा करू : विखे

## जलसंपदा मंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर लोणीत विखेंचा सत्कार

**लोणी प्रवरा : प्रतिनिधी**

**राज्यातील जनतेने ज्या विश्वासाने महायुतीला पाठबळ दिले, तो विश्वास कामातून सिद्ध करून दाखवण्याचा भविष्यात निश्चित प्रयत्न होईल. या जिल्ह्याने नेहमीच पाण्यासाठी संघर्ष केला आहे. जलसंपदा विभागाकडून शेतकऱ्यांसह सामान्य माणसाच्याही अपेक्षा पूर्ण करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून आता दुष्काळमुक्त जिल्हा करणे, हेच आपले उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले.**



लोणी येथील जनसंपर्क कार्यालयात मंत्री विखे पाटील यांचे अभिनंदन करण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातून महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक व प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. सर्वांच्या सत्काराचा आणि शुभेच्छांचा स्वीकार करून मंत्री विखे पाटील यांनी सर्वांशी संवाद साधला. माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, आ. किरण लहामटे, जलसंपदा विभागाचे नाशिक विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, मुळा लाभक्षेत्राच्या कार्यकारी अधिकारी सायली पाटील, निळवंडे प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता कैलास ठाकरे, प्रदीप हापसे, लघुपाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता हारदे यांच्यासह छत्रपती संभाजीनगर येथील गोदावरी लाभक्षेत्राशी निगडीत सर्व शाखांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. मंत्रिपदाचा कार्यभार हाती आल्यानंतर विखे पाटील यांचे प्रथमच मतदारसंघात आगमन झाले. जिल्ह्यातील भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी आणि मित्र पक्षांतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. जनसेवा संपर्क कार्यालयात विखे यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी झाली होती.

यावेळी विखे यांनी लोकांच्या समस्याही जाणून घेतल्या.

महायुती सरकारने दिलेली सर्व आश्वासने पूर्ण करण्याची हमी ही नव्याने स्थापन झालेल्या मंत्रिमंडळाकडून निश्चित होईल, अशी ग्वाही देताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, महायुती सरकारला सर्वात मोठा जनाधार मिळाला आहे. कारण, युती सरकारने ज्या योजना जाहीर केल्या, त्यांची अंमलबजावणी यशस्वीपणे झाली. महायुती सरकारने आपल्या कामातून लोकांना नवा विश्वास दिला होता. त्याच विश्वासाचे फलीत हे निकालाच्या माध्यमातून दिसून आले. भविष्यातही हाच विश्वास कामाच्या आणि योजनांच्या माध्यमातून कृतीत उतरवण्याचा प्रयत्न महायुती सरकार निश्चित करील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

(पान १ वरून)

### विरोधकांनी बीड, परभणीत जाण्यास माझी हरकत नाही

दोन उपमुख्यमंत्री ठरवतील. मला बीडला पाठवले तर मी जाईल. खरंतर मुख्यमंत्री कोणत्याही जिल्ह्याचे पालकत्व घेत नसतात. पण गडचिरोलीचे पालकमंत्रीपद घ्यावे, अशी माझी इच्छा असल्याचे फडणवीसांनी बोलून दाखवले. अर्थात दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी परवानगी दिली तरच घेईन, असेही ते म्हणाले.

### साईबाबांच्या झोळीत ८१० कोटींचे दान!

साईबाबा संस्थानतर्फे बँकांमध्ये केली जाणारी गुंतवणूक २९१६ कोटी रुपयांवर पोहचली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यात ३१६ कोटींची भर पडली आहे. गेल्या वर्षभरात संस्थानने पायाभूत सुविधा उभारण्यासाठी २८९ कोटी ४८ लाख रुपये खर्च केले आहेत. यातही गेल्या वर्षीच्या तुलनेत ९१ कोटी ४८ लाख रुपयांची वाढ झाली आहे. सर्वाधिक १४१ कोटी १७ लाखांचा खर्च आरोग्य सुविधांसाठी झाला आहे. वर्षभरात ९ लाख, १९ हजार रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. भाविकांसाठीच्या प्रसादालयासाठी ९३ कोटी ११ लाख रुपये खर्च झाले आहेत. सुमारे एक कोटी ५८ लाख भाविकांना या मोफत महाप्रसादाचा लाभ घेतला आहे. सशुल्क दर्शनपासचा लाभ ३० लाख भाविकांनी त्याचा लाभ घेतला आहे. यातून ६० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. सुमारे ३३ लाख भाविक भक्त निवासात राहून गेले आहेत.

### भारत-पाकिस्तान सामना २३ फेब्रुवारीला

२० फेब्रुवारी- भारत विरुद्ध बांगलादेश, दुबई
२१ फेब्रुवारी- अफगाणिस्तान विरुद्ध दक्षिण आफ्रिका, कराची
२२ फेब्रुवारी- ऑस्ट्रेलिया विरुद्ध इंग्लंड, लाहोर
२३ फेब्रुवारी-पाकिस्तान विरुद्ध भारत, दुबई
२४ फेब्रुवारी- बांगलादेश विरुद्ध न्यूझीलंड, रावळपिंडी
२५ फेब्रुवारी- ऑस्ट्रेलिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका, रावळपिंडी.
२६ फेब्रुवारी- अफगाणिस्तान विरुद्ध इंग्लंड, लाहोर.
२७ फेब्रुवारी- पाकिस्तान विरुद्ध बांगलादेश, रावळपिंडी.
२८ फेब्रुवारी- अफगाणिस्तान विरुद्ध ऑस्ट्रेलिया, लाहोर.
१ मार्च- दक्षिण आफ्रिका विरुद्ध इंग्लंड, कराची.
२ मार्च- न्यूझीलंड विरुद्ध भारत, दुबई
४ मार्च- उपांत्य फेरी १, दुबई
५ मार्च- उपांत्य फेरी २, लाहोर
९ मार्च- अंतिम सामना- लाहोर/दुबई.

### वाघोलीत शेतकऱ्याच्या शबंगल्यावर गोळीबार

पुंगळ्यासापडल्या. सातव यांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे, वाघोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडीत रेजितवाड यांनी घटनास्थळी भेट दिली. गोळीबाराची माहिती मिळताच घटनास्थळी न्यायवैद्यक प्रयोगशाळेतील तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळावरुन दोन पुंगळ्या जप्त केल्या आहेत. सातव यांच्या बंगल्याच्या खिडकीतून दोन गोळ्या झाडल्याचे उघडकीस आले आहे. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.

# संस्कृती आणि सभ्यतेचा सुंदर मिलाप!

## संगीता पारनेरकर यांचे प्रतिपादन | पोदार स्कुलमध्ये नाताळ आणि किसान दिन साजरा



■ पोदार लर्न स्कुलमध्ये नाताळ आणि किसान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

### विविध उपक्रम

**नाताळानिमित्त माय डॅडी, माय सांता अशा उपक्रमांद्वारे पोदार प्री प्रायमरीचे विद्यार्थी व त्यांचे सांता म्हणजेच वडिलांसोबत एका आगळया वेगळया स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. महिला पालकांसाठी पाककृती स्पर्धा घेण्यात आल्या. नृत्य, नाटक तसेच गायनाच्या माध्यमातून बळीराजाचे राहणीमान दर्शवितानाच बळीराजाप्रती आपल्या भावनाही यावेळी विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केल्या. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सेंद्रीय शेती करून उत्पन्नाची पौष्टिक गुणवत्ता वाढविण्यावर भर देणारे उपक्रम यावेळी सादर करण्यात आले.**

**पारनेर : प्रतिनिधी**

**गुरूमाऊली पोदार लर्न स्कुलमध्ये नाताळ आणि किसान दिवस एकत्र साजरा करणे म्हणजे संस्कृती व सभ्यतेचा सुंदर मिलाप असल्याचे प्रतिपादन सौ. संगीता गुणेश पारनेरकर यांनी केले.**

गुरूमाऊली पोदार लर्न स्कुलमध्ये २४ डिसेंबर रोजी नाताळ आणि भारतामध्ये हरित क्रांती घडवून आणणारे मा. पंतप्रधान चौधरी चरणसिंह यांच्या जयंतीनिमित्त किसान दिनाचे एकत्रीत आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार काशिनाथ दाते, व्ही. एस.म्युझिक कॉलेजच्या संगीता गुणेश पारनेरकर, तालुका कृषि अधिकारी गजानर घुले, जि. प. चे माजी सदस्य वसंत चेडे, संस्थेचे अध्यक्ष रामराव गाडेकर, सचिव मच्छिंद्र मते, तंटामुक्तीचे अध्यक्ष इंद्रभान गाडेकर, अनिरूध्द कासार, शांताराम तराळ आदी यावेळी उपस्थित होते.

### सांस्कृतीक कार्यक्रम आणि वैज्ञानिक प्रकल्प

**यावेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतीक कार्यक्रम सादर करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमतून आधुनिक शेतीचे विविध वैज्ञानिक प्रकल्पही काही विद्यार्थ्यांनी सादर केले. यावेळी आनंद नगरीचेही आयोजन करण्यात आले होते.**

### शाळेला सहकार्याचे आश्वासन

**आमदार काशिनाथ दाते यांनी विद्यार्थ्यांच्या विविध स्टॉलला भेटी देत वैज्ञानिक प्रकल्पांचे कौतुक केले. शाळेने वर्षात केलेल्या प्रगतीविषयी समाधान व्यक्त करीत सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.**

यावेळी बोलताना पारनेरकर म्हणाल्या, नाताळ आणि किसान दिन एकत्रीत साजरे करणे म्हणजे संस्कृत आणि सभ्यतेला एकत्र घेऊन चालणे होय. पोदार लर्न स्कुलने हा सुंदर मिलाप घडवून आणला. याच पध्दतीने या शाळेकडून भारतीय संस्कृतीचे संवर्धन तसेच विद्यार्थ्यांना जागतीकीकरणाच्या पार्श्वभुमीवर सक्षम करण्याचे उद्दीष्ट पुर्ण केले जाईल असा विश्वास पारनेरकर यांनी व्यक्त केला.

मुख्याध्यापिका शिल्पा सुदामे यांनी पहिल्याच वर्षी पालकांनी दाखविलेल्या विश्वास आणि प्रतिसादाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी आम्ही कटीबध्द असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेचे अध्यक्ष रामराव गाडेकर यांनी संस्थेच्या उभारणीचा इतिहास मांडला.कृषि अधिकारी गजनान घुले यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अडव्हान्स फार्मिंग प्रकल्पांचे कौतुक केले.

# स्पर्धा परिक्षेसाठी प्रयत्नांची गरज

## माजी मंत्री महादेव जानकर यांचे मत

**निघोज : प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन गुणवंत होउन अधिकारी होण्याची गरज असल्याचे मत माजी मंत्री व राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांनी व्यक्त केले.**



■ माजी मंत्री व राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला सदिच्छा भेट दिली यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

निघोज येथील शरदचंद्रजी पवार अभ्यासिकेला भेट देऊन त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट सभागृहात पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली.ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद व सचिव शांताराम कळसकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. माजी सरपंच ठकारामशेठ लंके या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय सचिव माऊलीनाना सलगर, रासपाचे प्रदेशाध्यक्ष अजितदादा पाटील, शिरुर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय बारहाते, योगेश खाडे, सुखदेव रसाळ, पत्रकार दत्ता उनवणे, ट्रस्टचे सहसचिव विश्वास शेटे, शंकरराव लामखडे, मंगेश वराळ, दिगंबर लाळगे, शंकरराव गुंड, गोरक्षशेठ ईरोळे, निलेश घोडे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी मंत्री जानकर यावेळी म्हणाले खासदार नीलेश लंके यांनी निघोज आणि परिसरातील विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षा तयारी करण्यासाठी अभ्यासिका दिली आहे. आज या ठिकाणी परिसरातील बहुसंख्य विद्यार्थी स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करीत आहेत. ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांनी या भागातील जनतेला शैक्षणिक सुविधा मिळण्यासाठी परिसरात विद्यालय, महाविद्यालय, माध्यमिक व प्राथमिक शाळा तसेच इंग्रजी शाळा यासाठी पाठपुरावा करीत शैक्षणिक कार्यासाठी योगदान दिले आहे.

आपल्या मुलांना शैक्षणिक कार्यात अग्रभागी राहण्यासाठी या अभ्यासिकेचा मोठा फायदा होणार असून मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने गेली चाळीस वर्षात धार्मिक कार्यात जसे योगदान दिले तसेच शैक्षणिक संस्कृतीला चालना देण्याचे काम केले आहे.अभ्यासिकेसाठी आपण स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना सोयी सुविधा मिळवून देण्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी वसंत कवाद यांनी ट्रस्टची माहिती दिली तसेच माजी मंत्री यांचे विचार व मार्गदर्शन प्रेरणादायी असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले. या वेळी प्रास्ताविक भाषणात पत्रकार दत्ता उनवणे यांनी गाव व परिसराची माहिती दिली. व्यवस्थापक महेश ढवळे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी सहसचिव विश्वासराव शेटे यांनी आभार मानले.

# यशस्वी जीवनासाठी खिलाडूवृत्ती आवश्यक

## सोनाली सालके पा.यांचे प्रतिपादन




**जवळा : प्रतिनिधी**

**खेळामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो .निर्णयक्षमता , सहानुभूती ,शिस्त आणि सहकार्याची भावना , जय पराजय खिलाडू वृत्तीने वाढीस लागून सांघिक भावना निर्माण होते. असे प्रतिपादन कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य सोनाली सालके यांनी विद्यार्थ्यांना केले.**

यावेळी ईरा इंटरनॅशनल स्कूलचे संचालक संदीप पाटील सालके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या. इरा इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणात शालेय क्रीडा महोत्सव संपन्न झाला. यावेळी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा जवळा चे मॅनेजर श्री . रजत सिंग ,श्री .शंकर भडांगे ,संस्थेचे संचालक श्री . संदिप सालके ,स्कूलच्या प्राचार्या सौ. सोनाली सालके उपस्थित होते .खेळाची सुरुवात संस्थेचे संस्थापक संदीप सालके यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आली.

धावणे ,उंच उडी , लांब उडी ,चेंडू फेक ,पोत्यातील उड्या, संगीत खुर्ची, लिंबू चमचा असे वैयक्तिक खेळ तर क्रिकेट , खो खो , कबड्डी असे सांघिक खेळ घेण्यात आले यामध्ये सर्व खेळाडू आपले सर्व कौशल्य पणाला लावून खेळत होते त्यामुळे सर्व सामने चुरशीचे झाले .खेळ संपल्यानंतर विजयी स्पर्धकांना वैयक्तिक खेळासाठी मेडल्स तर सांघिक खेळासाठी ट्रॉफी वाटप करण्यात आले .कार्यक्रमाची सांगता नाताळ साजरा करत सांताक्लॉजच्या हस्ते मुलांना खाऊ वाटप करत व आनंदाने अविष्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मादनकर मॅडम , सोमवंशी मॅडम , मनियार मॅडम ,जाधव मॅडम , छाया मॅडम, पांढरे मॅडम , टोणगे मॅडम , हिना मॅडम,इतर शिक्षकेतर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

# आनंद आणि उत्साहासाठी स्वास्थ्य व मन निरोगी हवे!

## योगशिक्षिका ज्योती येणारे यांचा कानमंत्र
## केडगांव येथे जागतिक ध्यान दिवस साजरा

**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**आपले स्वास्थ्य व मन हे दोन्हीही निरोगी असेल तर आपण आणि आपले कुटूंब कायमस्वरूपी आनंदी आणि उत्साही राहू शकेल असा कानमंत्र आहारतज्ञ आणि योग शिक्षिका ज्योती येणारे यांनी दिला.**



केडगांव येथील महापालिका व्यायामशाळेत जागतिक ध्यान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ज्योती येणारे यांनी धकाधकीच्या जीवनात ध्यानाचे आणि योगाचे महत्व विषद केले. त्या म्हणाल्या, काहीही झाले तरी दररोज आपण स्वत:साठी एक तास देणे अत्यंत गरजेचे आहे, हीच आपली निरोगी स्वास्थ्याची खरी गुरूकिल्ली आहे. व्यायाम करण्यासाठी किंवा ध्यान धारणा करण्यासाठी आपण कंटाळा करतो आणि त्यातूनच विविध आजार निर्माण होतात. ताण किंवा नकारात्मकता वाढते. त्यातून पुढे झोप न येणे आदी आजारांना आमंत्रण मिळते.

बी पी, थाररॉईड, महधुमेह आणि पीसीओडी सारखे आजार जडतात असे त्यांनी सांगितले. योगशिक्षिका ज्योती येणारे या दररोज महिलांना मार्गदर्शन करून त्यांना व्यायाम तसेच ध्यान धारणा करण्यास प्रोत्साहित करतात.

यावेळी रत्नमाला भोर, राधाबाई येणारे, दिपाली मेहेर, संगिता जाधव, नेहा ओझा, सोनाली कोलपकर, नीता रोकडे, शोभा धामणे, नैना पालेकर, सोनिया दिक्षित, वसुधा दहातोंडे, मिनाक्षी काठमोडे, शितल जांगडा, ज्याती सातपुते, सारिका भापकर, सुनंदा सोनवणे, सुवर्णा चोरडीया, मेघा कावरे, पुनम देशमुख आदी महिला उपस्थित होत्या.

# लाठीमारातील जखमींना सहाय्यता निधी मिळावा

## लोकनाथ फाउंडेशनची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**सुपा : प्रतिनिधी**

**परभणी येथे सामाजिक आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीमारामध्ये गंभीर जखमी झालेल्या समाज बांधवांवर उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळावी अशी मागणी नगर येथील लोकनाथ फाउंडेशनच्या वतीने मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.**



■ परभणी येथे झालेल्या लाठी चार्जमध्ये जखमी झालेल्या समाज बांधवांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मदत देण्याची मागणीचे निवेदन लोकनाथ फाउंडशेनच्या वतीने देण्यात आले.

यासंदर्भात फाउंडशेनच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांना निवेदन सादर केले आहे. लोकनाथ फाउंडेशनचे संस्थापक डॉ. करणसिंह गाडे, फाउंडेशनचे निमंत्रक व रूग्णसेवा करणारे नितीन म्हस्के, निवेदक अक्षय सुर्यवंशी यांच्यासह समाज बांधवांचा जिल्हाधिकाऱ्यांना भेटलेल्या शिष्टमंडळात समावेश होता.

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, परभणी येथे आंबेडकरी समाजावर पोलीसांकडून करण्यात आलेल्या लाठी चार्जमध्ये अनेक बांधव गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपचारासाठी मदतीची आवश्यकता असून मुख्यमंत्री सहाययता निधीमधून या उपचारासाठी मदत मिळणे आवश्यक आहे. लाठी चार्जमध्ये जखमी बांधवांवर गुन्हेही दाखल करण्यात आले असून हे गुन्हेही मागे घेण्यात यावेत अशी मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाकडे रवाना करण्यात आल्या आहेत.

# मोबाईलच्या मोहात न पडता पुस्तके वाचा

## प्रा. देवेंद्र बहिरम यांचे आवाहन




**सुपा : प्रतिनिधी**

**सध्याच्या काळात विद्याथ तसेच तरूणांना मोबाईलवरील रिल्सचे आकर्षण असून मोबाईलच्या मोहात न पडता पुस्तके वाचा तुमच्या आयुष्याला आकार मिळेल असे आवाहन प्रा. देवेंद्र बहिरम यांनी केले.**

श्रीगोंदे तालुक्यातील देवदैठण येथे शिरूरच्या चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिरामध्ये आयोजित व्याख्यानमालेत श्रीगोंदे येथील महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालायचे प्राध्यापक देवेंद्र बहिरम यांनी शिबिराथशी संवाद साधला.

आत्मनिर्भर भारत या विषयावर बोलताना आजचा युवक कसा असावा यावर त्यांनी प्रकाश टाकला. इतिहासातील अनेक दाखले देत विद्यमान युवक आपले हक्क व अधिकार, कर्तव्ये विसरत चालला आहे. त्याला मोबाईलवर रिल्स पाहून, त्यालाच सत्य मानू लागला. त्याचे वाचनाकडे दुर्लक्ष होत आहे. ही जाणीव स्वयंसेवकांना करून देत वाचन करण्यासाठी त्यांनी इतिहासातील दाखले देत प्रोत्साहित केले.

अतिशय उत्साहाच्या वातावरणात सुरू झालेल्या शिबिराच्या दुसऱ्या दिवसाची सुरूवात क्रीडा मार्गदर्शक प्रा. योगेश आव्हाड यांच्या समवेत सर्वांग सुंदर व्यायामाने झाली. त्यानंतर देवदैठण गावातील शाळा परिसर व मंदिर परिसरातील स्वच्छता स्वयंसेवकांनी श्रमदानाच्या माध्यमातून केली. या स्वच्छतेतून श्रमसंस्कार मुल्यांची रूजवण करण्याचा प्रयत्न झाला. यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक काकडे, डॉ. रेणुका करपे, डॉ. सिध्दार्थ कांबळे, प्रा. दिपाली टोणगे, डॉ. अजित चंदनशिवे आदी उपस्थित होते.

# कवाद पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

## गीतांजली शेळके, शांताराम लंके यांनी केले प्रकाशन



**निघोज : प्रतिनिधी**

**पतसंस्था चळवळीत राज्यात नावलौकिक मिळविलेल्या बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेच्या सन २०२५ या वर्षाच्या दिनदर्शिकेचे महानगर व जिल्हा बँकेच्या संचालक गीतांजली शेळके व उद्योजक शांताराम लंके यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.**

कवाद सेवाभावी संस्थेच्या न्यू इंग्लिश मेडियम स्कुलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात हे प्रकाशन पार पडले. महानगरचे व्हा. चेअरमन भास्कररव कवाद, संस्थेचे चेअरमन वसंत कवाद, मा. सरपंच ठकराम लंके, पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेव थोरात आदी यावेळी उपस्थित होते.

दिनदर्शिकेमध्ये संस्थेची भक्कम आर्थिक स्थितीची माहीती देण्यात आली असून मुदत ठेवीवर देण्यात येणारा व्याजदर, इतर ठेव योजनांची माहीती, सोने तारण कर्जावर ९ टक्के तर इतर कर्जासाठी ११ टक्के व्याजदर यासह संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या सुविधांची माहीती या दिनदर्शिकेत आहे. शाखा परिसरातील यात्रा, उत्सव, सप्ताह, सण याबाबतची माहीतीही दिनदर्शिकेमध्ये देण्यात आली आहे.

यावेळी संस्थेचे संचालक चंद्रकांत लामखडे, दामुशेठ लंके, भिवाशेठ रसाळ, शांताराम कळसकर, बाबाजी कळसकर, प्रकाश कवाद, लताबाई कवाद, वैशाली कवाद, मुख्य कार्यकारी अधिकरी दत्तात्रय लंके, फलोद्यान संस्थेचे व्हा चेअरमन अमृताशेठ रसाळ, संचालक रामदास वरखडे, प्राचार्य डायस आदी उपस्थित होते.

# गुलाबी थंडीत रंगले शेकोटी काव्य संमेलन !

## पारनेर साहित्य साधना मंचचा उपक्रम

**निघोज : प्रतिनिधी**

**गुलाबी थंडीची हुडहुडी... सडा, रांगोळीसह सजवलेल्या रानात पेटलेली शेकोटी... शेकोटी भोवती सादर होणार्या एकाहून एक सरस कविता, गझल... व बेभान होऊन ऐकणारे श्रोते... असे अनोखे काव्य संमेलन नुकतेच निघोज येथे रंगले.**



### कविता ही वेदनेचा हुंकार

**कविता ही वेदनेचा हुंकार आणि काळजाचा झंकार असते. नवकवींनी प्रसिद्धीचा हव्यास धरून उथळपणे न लिहिता सखोल चिंतन करावे.**

**संजय पठाडे, ज्येष्ठ गझलकार**

पारनेर साहित्य साधना मंचने या संमेलनाचे आयोजन केले होते. ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत वानखेडे हे संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते तर ज्येष्ठ गझलकार संजय पठाडे, ज्येष्ठ साहित्यिक कारभारी बाबर, ज्येष्ठ कवी गुलाबराजा फुलमाळी हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

निघोज येथील युवा कवी संदीप राठोड यांनी शेकोटी काव्य मैफिलीसाठी कवींना निमंत्रित केले होते. शेकोटी प्रज्वलन करून आणि रोपट्याला पाणी घालून मैफिलीची सुरुवात करण्यात आली. कवी सोमनाथ चौधरी, संदीप राठोड, रामदास पुजारी, डॉ. प्रवीण जाधव, साहेबराव घुले, अशोक गायकवाड, भाऊसाहेब गवळी, संदीप रासकर, गुलाबराजा फुलमाळी व भाऊ राऊत इत्यादी कवींनी एकाहून एक सरस कविता व गझल सादर केल्या. त्यांना श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.ज्येष्ठ गझलकार संजय पठाडे यांनी नवोदित कवींना मार्गदर्शन करीत काही बहारदार रचना सादर केल्या. त्या ऐकून श्रोते मंत्रमुग्ध झाले.

संमेलनाचे अध्यक्ष चंद्रकांत वानखेडे यांनी कवितेवर भाष्य करताना म्हटले की, आईच्या प्रेमातून आणि पांडुरंगाच्या भक्तीतून कवितेची प्रेरणा मिळते. पारनेरसारख्या ग्रामीण भागात दर्जेदार कविता लिहिली जाते याचे कौतुक वाटते. यानंतर वानखेडे यांनी विविध रचना सादर करून श्रोत्यांना अंतर्मुख केले.

कवी संमेलनानंतर सर्वांनी शेकोटीभोवती सहभोजनाचा आस्वाद घेतला. राठोड परिवाराने संमेलनाची संपूर्ण व्यवस्था केली होती. संदीप राठोड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संदीप रासकर यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. प्रवीण जाधव यांनी आभार मानले. संमेलनाला राष्ट्रपती पुरस्कार विजेते मुख्याध्यापक बन्सी गुंड, ॲड. नंदकुमार पवळे, रामदास भुकन, राजेंद्र भुकन, संपत रसाळ, पत्रकार आनंद भुकन, सागर अनंत, राम भुकन, विशाल चव्हाण, नवनाथ चव्हाण यांच्यासह अनेक श्रोते उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com